
सोलापूर
प्रखर राष्ट्रीय विचारांचे दैनिक
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
संभाजीनगर, सातारा, सोलापूर, अहमदनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून प्रकाशित



## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सायबर क्लबची स्थापना

**सोलापूर, दि. २ जुलै-**

सायबर गुन्ह्यांविषयी जनजागृती आणि विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र संकुलामध्ये 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत सायबर क्लबची स्थापना करण्यात आली. हा उपक्रम क्विक हील फाऊंडेशनसोबत झालेल्या सामंजस्य कराराच्या अंतर्गत राबविण्यात येणार आहे. सायबर क्लबचे नूतन पदाधिकारी याप्रमाणे; अध्यक्ष- विपाशना खराटे, सचिव-प्रणाली मासाळ, ॲक्टिव्हिटी डायरेक्टर- सौंदर्या कांबळे, मिडीया डायरेक्टर-सचिन धामणेकर. समन्वयक-डॉ. राजीवकुमार मेंते. गायत्री केसकर, दीपू सिंग, अनुपमा काटकर, अजय शिर्के यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, डिजिटल सुरक्षितता, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण आणि जनजागृती उपक्रमांची अंमलबजावणी याविषयीची माहिती दिली.